MHRT080001452022

**नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०२२**

**मधील निशाणी ५९ खालील आदेश**

वादीने सदरचा अर्ज हा आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे असे कथन आहे की, वादी यांनी स्वत: व प्रतिवादी क्र. ४ ते ७ यांचे हक्क अधिकारासंबंधी ठराव होवून मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ७ हे सही करण्यासाठी उपस्थीत नसल्यामुळे निव्वळ त्यांना प्रतिवादीपणात सामील केल्याविषयी मजकूर परि.क्र१० मधे नमुद केला आहे. सदरच्या दाव्यामध्ये श्री. देव बोरेश्वर मंदीरामध्ये महाशिवरात्रीचे दिवशी सकाळी ६ ते ११.०० या कालावधीमध्ये पूजाअर्चा, जलवृष्टी, महारूद्रा अभिषेक महाशिवरात्री वाती प्रज्वलीत करणे आणि महाआरती करणे याचा मान वादी आणि सामील प्रतिवादी यांचा असल्याचे जाहीर करून मिळावे अशी मागणी वादीने केली आहे. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी दावा मान्य असल्याचे मे. न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी कळविले आहे. दावा विषयक हितसंबंधीत व्यक्ती म्हणून वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ७ दाव्यामध्ये पक्षकार आहेत. या दाव्याच्या कामी दावा प्रातिनिधीक स्वरूपाचा असल्या विषयी नोटीसा काढणे आवश्यक ठरणार नाही. सबब या संबंधी दाव्यातील मजकूर दुरूस्ती करून काढून टाकणे आवश्यक झाले आहे.

२. अर्जात कथन केले आहे की, दावा परिच्छेद ३ मध्ये ९व्या ओळीच्या अखेरीस, “मात्र विशिष्ट दिवशी अनेक वर्षाच्या निरंतरपणे करीत असलेल्या पूजेच्या अनुषंगाने मान असल्याबाबत हक्क ठराव मागत असल्याने हा दावा प्रातिनिधीक स्वरूपाचा ठरणारा आहे. सबब दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम ८ अन्वये जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याकरीता परवानगी मिळण्याचा अर्ज अलहिदा दाखल केला आहे ”हा

मजकूर दाव्यातून वगळण्यात यावा व तशी दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी.

४. वादीतर्फे वकील श्री. आठल्ये यांनी युक्तीवाद केला की, नमुद दुरूस्ती केवळ तांत्रिक स्वरूपाची आहे. दुरूस्ती मंजूर झाल्यास दाव्याच्या विषयास कोणतीही हानी पोहचणारी नाही मुळ दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. प्रतिवादी १ ते ३ चे नुकसान होणार नाही. मात्र नामंजूर केल्यास वादीचे पैशाच्या स्वरूपात कधीही भरून येणार नाही असे अपरिमित नुकसान होईल सबब अर्ज मंजूर करण्यात यावा. याअर्जाच्या पुष्टयर्थ नि. ६० येथे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

५. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री. सि. व्ही लिंबूकर यांनी नि. ६१ येथे म्हणणे दाखल करून अर्जास कडाडून विरोध केला आहे. त्यांनी कथन केले आहे की दुरूस्ती मुळे मुळ दाव्याच्या स्वरूपातच बदल होणार आहे. अर्जातील कथनावरूनच स्पष्ट होते की वादीने पूर्वग्रह दुषीत हेतूने प्रतिवादींना अडचणीत आणण्यासाठी खोटा व खोडसाळ दावा केला आहे. सबब दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १६ अन्वये दावाच रद्द होणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज वर नमुद तरतुदीनुसार फेटाळण्यात यावा.

६. दोन्ही बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. पुढील वाद प्रश्न या अर्जाकामी उपस्थित होता त्याची कारणासह निष्कर्ष खालील नमुद केलयाप्रमाणे -

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | प्रस्तावीत दावा दुरूस्ती मंजूर होण्यास पात्र आहे काय? | होय |
| ०२ | काय आदेश? | **अर्ज मंजूर करण्यात येतो** |

## कारणमिमांसा

७. अर्ज, दावा, अर्जावरील म्हणणे प्रतिवादीची कैफियत मुदयांचे अवलोकन

केले या अर्जाअन्वये वादी करू इच्छीत असलेली दावा दुरूस्ती मंजूर झाल्यास दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होवू शकतो असा युक्तीवाद प्रतिवादीच्या वकीलांनी केला. मात्र इथे नमुद करणे गरजेचे आहे की वादी हा त्याच्या दाव्याचा dominus litis असतो सबब वादी मागू इच्छीत असलेली दुरूस्ती केल्याने प्रतिवादीचे कशा प्रकारे अपरिमित नुकसान होवू शकते याचा खुलासा प्रतिवादीतर्फे वकीलांनी केला नाही. अदयाप दावा चौकशीवर आहे अशा परिस्थीतीत वादी मागू इच्छीत असलेली दुरूस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही अपिरिमित असे नुकसान होवू शकत नाही. शिवाय दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १६ अन्वये न्यायालयीन प्रक्रीयेचा दुरूपयोग कसा झाला याबाबत कोणतेही स्पष्टीकरण प्रतिवादीतर्फे देण्यात आले नाही. सबब न्यायाचा समतोल पहाता दावा दुरूस्ती मंजूर करणे अपिहार्य आहे. निश्चीतच दुरूस्त दाव्याच्या प्रतिवर आपली कैफियत देण्याचा अधिकार प्रतिवादीस राहिलच. सबब दावा दुरूस्ती मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो -

## - आदेश -

१. अर्ज निशाणी ५९ मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी आज अगर पुढील तारखेस प्रतिवादी क्र. १ व २ ला रक्कम रूपये २,०००/- देण्याच्या अटीवर दावा दुरूस्ती मान्य होईल.

३. सदरची दावा दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर दाखल करावी व त्याची प्रत विरुध्द पक्षास देणे.

sd/-

**स्थळ - देवरुख**
**दि. ०२/०५/२०२४**

**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**देवरुख**

# -: CERTIFICATE :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 17/2022 Exh 59 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade (Jr. clerk) |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 02/05/2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 02/05/2024 |
| Order uploaded on | : | 04/05/2024 |